पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक – ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **२७/०१/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२७/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२) मा. जवळकर वैशाली राहूल
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव
५) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
६) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.डॉ.गडलींगकर - वैद्यकीय अधिकारी, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.संस्था, मोरवाडी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) शहरातील सार्वजनिक गर्दीच्या विविध ठिकाणी महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह बांधणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २३/१२/२०१५ व १३/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २७/०१/२०१६ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सुचक - मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक - मा.शैलजा शितोळे
संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०३/कावि/३६/२०१६, दि.२१/०१/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्रं. ४५७ दि.२०/१/२०१४ अन्वये मंजूर धोरणानूसार घटक योजना क्रं. ९ दिड वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटांस अर्थसहाय्य देणे. ही योजना राबविण्यात येते. या योजने करिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटना नुसार अर्ज मागविणेत आले असता एकूण ७२ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटीशर्ती नुसार तपासणी केली असता एकूण ७२ अर्ज पात्र ठरले आहे. सदर पात्र बचतगटालाप्रत्येकी रक्कम रू २०,०००/- या प्रमाणे रक्कम रु १४,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु चौदा लाख चाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात “ दिड वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटास अर्थसहाय्य ” या उपलेखाशिर्षावर रक्कम रु ४०,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये चाळीस लाख फक्त) इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामधून सदरचा खर्च करण्यात येईल. पात्र ठरणा-या बचतगटाला अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चास रक्कम रू १४,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु रु चौदा लाख चाळीस हजार फक्त) तसेच ही योजना १२ ही महिने खुली असल्यानेसन २०१५-१६ अखेर पर्यत जेवढे अर्ज प्राप्त होतील त्या बचतगटाला पात्र ठरणा-या महिला बचतगटाला अनुदान मंजूर करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २७/०१/२०१६
सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ - मा.सुमन नेटके, मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहराच्या विविध भागात शहरातील सार्वजनिक दैनंदिन गर्दीच्या ठिकाणी तसेच धार्मिक स्थळाशेजारी, भाजी मंडई, रेल्वे स्टेशन, महत्वाचे बसथांबे, भक्ती-शक्ती उद्यान, इतर उद्याने या ठिकाणी महिलांसाठी नैसर्गिक विधी पार पाडण्यासाठी सुविधा नसल्याने अडचणीचे होत

आहे. त्याअनुषंगाने शहरातील सार्वजनिक गर्दीच्या विविध ठिकाणी महिलांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४६ /२०१५
दिनांक : २७/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.